ATOMIC ENERGY CENTRAL SCHOOL NO. 2, MUMBAI

**PERIODIC TEST – 1 (2023 – 24)** Date:18/07/23

M.M: 40 Class VIII 2nd Lang. Marathi Time: 90Min

Marathi- Balbharti-7th (L-2,4,7,9)

प्रश्न 1 अ] खालील पठीत गद्य उतारा वाचून योग्य उत्तराचा पर्याय निवडा : (5)

सकाळच्या प्रसन्न हळदुल्या किरणांना साक्ष ठेवून त्या पिल्लाचा नामकरण सोहळा क्षणभरात आटोपला गेला. त्याच्या दांडग्या शरीराला अनुरूप असं त्याचं 'डांग्या' नाव ठेवलं. मित्रमंडळींनाही त्याचं नाव आवडलं. आता तोही सगळयांचा खास मित्रच बनला. प्रत्येकाला त्याचा लळा लागला. त्याची दुडुदुडु चाल भावणारीच. त्याचे तेजस्वी डोळे अगदी बोलके. त्याच्या मनातील गोष्टीला जणू उजाळा देणारे. अंगावर पडणारी त्याची झेप उत्साह द्विगुणित करणारी.

डांग्या लहानाचा मोठा होऊ लागला. वाढत्या वायासोबत त्याचा चेहरा अधिक प्रसन्न, शरीरयष्टी अधिक दणकट. त्याचं तरणंबांड शरीर येणा-या जाणा-याच्या नजरेला भुरळ घालणारं. दोन्ही डोळयांच्या खाली असलेले पिवळसर पट्टे आणि मागच्या पायांच्या बोटावर असलेले लालसोनेरी पट्टे सगळयांचे लक्ष आकर्षित करणारे.

डांग्याचं ओटयावर पाय पसरून बसणं, रस्त्यावरून ये-जा करणा-यांच्या डोळयांना मोहून टाकणारं. दूर वरून आलेली मित्रमंडळींची शीळ तर त्याची जणू पाठच झालेली. शिळेच्या रोखानं त्याचं दुडदुडणं लक्षवेधक. सा-या गावाला भुरळ घातलेली. त्याचं सोज्वळ रूप पाहून आईबाबांनासुद्धा त्याचा नकळत लळा लागून गेला. डांग्यालाही त्यांच्याविषयी खूप जिव्हाळा. त्यानं जणू त्यांच्या थेट हृदयात प्रवेश केला.

१. डांग्याच्या नामकरण सोहळयाचे साक्षीदार ______ हे होते.

(लेखकाचे वडील / मित्र / कोवळे सूर्यकिरण / येणारे जाणारे लोक )

२ डांग्याच्या __________ या गोष्टीचे सर्वांना आकर्षण असे.

(प्रसन्न चेहरा /तरणंबांड शरीर /डोळे व मागच्या पायांवरचे पिवळसर पट्टे /दुडुदुडु चाल)

३. डांग्याने 'जणू त्यांच्या हृदयात प्रवेश केला' असे लेखक का म्हणतो?

४. कोणत्या दोन गोष्टींनी सा-या गावाला भुरळ घातली होती?

५. थंडीत कुडकुडणारं कुत्र्याचं पिल्लू तुम्हाला सापडलं तर तुम्ही काय कराल?

प्रश्न 1 ब] खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही ) (2)

१. श्रेष्ठ लोक स्वप्नांबद्दल काय म्हणत असतात ?

२. स्वप्न विकणा-या माणसाचा गावात येण्यामागचा उद्देश काय होता ? .

३. लेखकांनी कुत्र्याच्या पिल्लाला थेट घरी का आणले ?

प्रश्न 1 क] खालील वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा. ( कोणताही एक ) (1)

(१) गहिवरून येणे   २) काळजात धस्स होणे

प्रश्न 2 अ] खालील पठित कवितेच्या ओळी वाचून प्रश्नांची उत्तराचा योग्य पर्याय निवडा (8)

श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे ;
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरूनी ऊन पडे.
वरती बघता इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे
मंगल तोरण काय बांधले नभोमंडपी कुणी भासे!
झालासा सूर्यास्त वाटतो सांज अहाहा! तो उघडे,
तरुशिखरांवर उंच घरांवर पिवळे पिवळे ऊन पडे.
उठती वरती जलदांवरती अनंत संध्याराग पहा;
सर्व नभावर होय रेखिले सुंदरतेचे रूप महा.
बलाकमाला उडता भासे कल्पसुमांची माळचि ते
उतरूनी येती अवनीवरती ग्रहगोलचि की एकमते.
फडफड करूनी भिजले अपुले पंख पाखरे सावरिती
सुंदर हरिणी हिरव्या कुरणी निज बाळांसह बागडती

१) श्रावण महिन्यात सगळीकडे _______ दाटलेली असते.

(खुशी / हिरवळ / ऊन -सावली / सुंदरता)१

२) आकाशात दिसणा-या इंद्रधनुष्याची तुलना कवी _______ व ______ बरोबर करतो.(इंद्रधनुष्य व तरुशिखरे /दुहेरी गोफ व मंगल तोरण/तोरण व तारे / बगळयांची माळ व इतर पक्षी) १

३) संध्याकाळचे रंग या अर्थाचा कवितेत आलेला शब्द _____ हा आहे.

(जलद/अवनी/संध्याराग/अनंत) १

४) बगळयांची माळ यासाठी कवितेत आलेला शब्द शोधून लिहा. १

५) श्रावणमासात दिसणा-या पक्षी जीवनाचे कवीने कोणत्या शब्दात वर्णन केले आहे? २

६) श्रावण महिन्यातील ऊन सावलीच्या खेळाचे वर्णन करणा-या कवितेतील ओळी लिहा.२

ब] खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा. (2)

रानवा-याच्या ________।  ______________ भिजली ।।
लेऊनिया ____________ ।  _______________सजली ।।
माझ्या भाषेचे ________।___________ भाग्यवंत ।।
तिचा नाही _________ ।_________________ पंथ।।

प्रश्न 3 अ] समान अर्थी शब्दाचा योग्य पर्याय निवडा: (2)

१) वारा - ________ (मारुत / वायू / पवन / पहिले तिनही)

२) पाणी - ________ (लोचन / पेय / पानी / उदक)

आ] खालील शब्दांचे योग्य विरुद्ध अर्थी शब्द निवडा (2)

१) जय x ________ (विजय / पराभव/ पराजय/अपयश)

२) शेवट x _________ (अंत /अखेर / सुरुवात / आरंभ)

इ] खालील शब्दांचे लिंग बदललेला योग्य शब्द निवडा. (2)

१) गाय - ________ (बैल/ रेडा/ वासरू / गोधन)

२) मांजर - _________ ( भाटी / बोका / कुत्रा / मांजरी)

ई] खालील शब्दांचे वचन बदलेला योग्य शब्द निवडा (2)

१) पाटी - _________ ( पाट / पाटे / पाट्या / पाटा)

२) कळी - ________ ( कळ्या / कळी / कळा / कळि )

उ] खालील समुहवाचक योग्य शब्द निवडा. जसे: द्राक्ष- घड , हरिण- कळप (2)

१) फुले - ________ ( जुडी / गट / गुच्छ )

२) माणूस - ________ ( कळप / घोळका / घड )

ऊ] खालील शब्दसमूहास एक शब्द लिहा. (2)

१) कडाक्याची थंडी - _________

२) अनेक गुणांनी युक्त व्यक्तिमत्व - ___________

प्रश्न 4 सूचनेनुसार सोडवा : ( कोणतेही सहा ) (6)

१) (रस्ता) _________खूप गर्दी जमली होती. [ कंसातील शब्दाचे योग्य सामान्य रूप वापरा ]

२) खेळाचे शिक्षक सांगतात, दररोज व्यायाम करा. [क्रियाविशेषण ओळखा]

३) हा फोटो फार सुंदर आहे. [ अधोरेखित शब्दाची जात ओळखा]

४) घरामध्ये खूप पसारा पाहून आई ओरडली. [शब्दयोगी अव्यय ओळखा]

५) संकटात मदत करतो तोच खरा मित्र! [वाक्यातील सर्वनाम ओळखा]

६) आईचा हात रांगोळी काढतना भरभर फिरत होता. [ अधोरेखित शब्दांची जात ओळखा]

७) चूक झाली तर लगेच माफी मागावी. [ वाक्यातील क्रियापद ओळखा]

८) जर .. तर हे शब्द वापरुन एक वाक्य तयार करा.

प्रश्न 5 खाली दिलेल्या मुद्दयांवरून गोष्ट तयार करा. (कोणतीही एक ) (4)

१) काही कारणाने गरीब झालेला एक राजा - खूप तपश्चर्या करतो - देव - तुला एकच वर मिळेल- पाच वर्ष एक राज्य बक्षीस म्हणून मिळेल परंतु त्यानंतर शिक्षा म्हणून एका निर्जन बेटावर जावे लागेल - देवाची अट मान्य - पाच वर्ष राज्य करतो - सत्कर्म - शिक्षा रद्द - शेवट - तात्पर्य.

२) नवरा -बायकोचे सततचे भांडण- बायको एका साधूकडे - सल्ला - एका कलशात मंतरलेले पाणी देतो - ते नवरा घरी येण्याच्या वेळी तोंडात पाण्याची गुळणी म्हणून ठेवायचे - बायको तसे करते- बरेच दिवस जातात - भांडणे कमी होऊ लागतात - नवरा शांत होतो - बायको आश्चर्यचकित - साधू महाराजांचा सल्ला- तात्पर्य-

xxxxxxxxxxxxxxx